# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२३**

**सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३**

## दिव्यांग कल्याण विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ११**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: झेडआय-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**रूपये:- १४,१२,६५,९७,०००/-**<br>**श्री. धनंजय मुंडे** |
| (१) | ५८८७ | १०० | दिव्यांग कल्याण अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना सामान्य व्यक्तीप्रमाणे जीवन जगता यावे यासाठी शासनाच्या मध्यस्तीने गरजू आर्थिक दुर्बल दिव्यांग व्यक्तींना पूरक सहाय्यक उपकरणे उपलब्ध व्हावीत, यासाठी विभागाने सुरू केलेल्या 'mahasharad.in' या पोर्टलला आर्थिक सहाय्य, दाते व अन्य सुनियोजन उपलब्ध करून देण्याबाबत तसेच याबाबत जनजागृती करण्याबाबतची आवश्यकता, त्यावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (२) | ५८०९ | १० | दिव्यांग बांधवांसाठी राज्य सरकारच्या विविध योजना असणे, विविध कायदे असणे, मात्र तरी देखील या योजनांची योग्य प्रकारे अंमलबजावणी होत नसणे, त्यामुळे रोजच्या जीवनात दिव्यांग बांधवांना संघर्ष करावा लागणे, शासनाने दिव्यांग बांधवासाठी असलेल्या योजनांमध्ये सुलभता आणण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३) | ५८१९ | १० | मनोविकलांगासाठी असलेल्या अशासकीय संस्थांना सहाय्यक अनुदान, (राज्यक्षेत्र) (कार्यक्रम) असणे, मात्र ही योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसणे, ठाणे जिल्ह्यामध्ये मनोविकलांगासाठी असलेल्या रुग्णालयामध्ये अतिरिक्त खाटांची आवश्यकता असणे, डॉक्टर्स ची संख्या कमी असणे तसेच सीटी स्कॅन मशीन, एमआरआय मशीन नसणे, पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५८२२ | १० | अंध व्यक्तीसाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहायक अनुदान, (कार्यक्रम) असणे, मात्र मुंबईत वरळी येथे असलेल्या "नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड इंडिया" मधील अंध व्यक्तींना औषधे न मिळणे, डॉक्टरच नसल्याने अंध व्यक्तींना वेळीच उपचार मिळत नसल्याने, अंध व्यक्तींची हेळसांड होत असणे, त्यामुळे अंध व्यक्तींमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, सदरील |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | "नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड इंडिया" अंध व्यक्तींना या योजनेच्या माध्यमातून योग्य ते लाभ मिळावेत यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५) | ५८३२ | १० | लघुउद्योगासाठी दिव्यांग व्यक्तींना वित्तीय सहाय्य (कार्यक्रम) असणे, मात्र या योजनच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना सर्वोच्च न्यायालयाचे आदेश मुळे मुंबईत फूटपाथ वर नवीन दूरध्वनी बुथ न मिळणे, त्यामुळे दिव्यांग व्यक्तींमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ५८४१ | १० | बहिऱ्या व मुक्या व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य (राज्य क्षेत्र) (कार्यक्रम) असणे, मात्र मुंबई माझगाव येथे बॉम्बे इन्स्टिट्यूट फॉर डेफ अँड म्यूट्स या योजनेसाठी अपुरा निधी असणे, योजना राबविण्याची गरज निर्माण झाली असणे, परिणामी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी बहिऱ्या व मुक्या व्यक्तींत निर्माण झालेला तीव्र असंतोष सदर योजनेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | ५८४६ | १० | शारिरीकदृष्ट्या दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव इत्यादी देणे (कार्यक्रम) असणे, मात्र शारीरिकदृष्ट्या विकलांग मुंबईची फेलोशिप, हाजी अली मुंबईत येथे निधी अभावी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, हाजी अली, मुंबई येथे शारीरिकदृष्ट्या विकलांग मुंबईची फेलोशिप असलेल्या संस्थेच्या माध्यमातून अपंगांसाठी अससेल्या शिष्यवृत्ती योजनांची निधी अभावी प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे, त्यामुळे दिव्यांग व्यक्तींमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी शासनाने कारावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ५८६० | १० | अस्थि विकलांग व्यक्तींसाठी कामे करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य, (कार्यक्रम) असणे, नवी मुंबईत आधारवड निराधार आणि अपंग महिला उत्कर्ष ट्रस्ट या अशासकीय संस्थांना योजनेसाठी पुरेसा निधी नसणे, विकलांग व्यक्तींना वेळीच उपचार मिळत नसल्याने विकलांग व्यक्तींची हेळसांड होत असणे, त्यामुळे विकलांग व्यक्तींमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने कारावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | ५८६८ | १० | मनोविकलांग व्यक्तीसाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य (कार्यक्रम) योजना असणे, मात्र योजनेची अंमलबजावणी मुंबईमध्ये योग्य प्रकारे न होणे, मुंबईत मानव फाउंडेशन या संस्थाला योजनेची अंमलबजावणी होण्याच्या मार्गात अपुरा निधी ही एक प्रमुख अडचण असणे, वेळीच गरजू व गरीब मनोविकलांग व्यक्ती उपचार मिळत नसल्याने, गरजू व गरीब मनोविकलांची हेळसांड होत असणे, त्यामुळे गरजू व गरीब मनोविकलांमध्ये पसरलेले तीव्र चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, योजनेची अंमलबजावणी पूर्ण क्षमतेने व्हावी याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ५९०० | १० | राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत दिव्यांगासाठी स्वतंत्र मंत्रालयाचा प्रस्ताव मंजूर होणे, स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करणे गरजेचे असणे, दिव्यांगांचे असंख्य प्रश्न प्रलंबित राहणे, स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विक्रमसिंह सावंत** |
| (११) | ५९१२ | १० | सांगली जिल्हयातील जत तालुकयाची लोकसंख्येचा विचार करता याठिकाणी दिव्यांगासाठी दिव्यांग भवन करण्याची आवश्यकता असुन त्यासाठी निधीची उपलब्ध करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २१ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) दिव्यांग कल्याण विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई